# सन २०२० चे विधानसभा विधेयक क्रमांक ५१

## शक्ती फौजदारी कायदे (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०२०

यावरील

# संयुक्त समितीचा अहवाल

सत्यमेव जयते

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन,
मुंबई.

# सन २०२० चे विधानसभा विधेयक क्रमांक ५१

## शक्ती फौजदारी कायदे (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०२०

यावरील

# संयुक्त समितीचा अहवाल

**सन २०२० चे विधानसभा विधेयक क्रमांक ५१-शक्ती फौजदारी कायदे (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०२० यावरील दोन्ही सभागृहाच्या संयुक्त समितीची रचना.**

*** श्री. अनिल देशमुख, मा. गृह मंत्री - समिती प्रमुख**

**सदस्य :**

(१) श्री. जितेंद्र आव्हाड, मा. गृहनिर्माण मंत्री
(२) ॲड. अनिल परब, मा.संसदीय कार्य मंत्री
(३) श्री. सुरेश वरपुडकर, वि.स.स.
(४) श्री. दिपक केसरकर, वि.स.स.
(५) श्रीमती प्रणिती शिंदे, वि.स.स.
(६) श्रीमती माधुरी मिसाळ, वि.स.स.
(७) श्री. सुनिल प्रभू, वि.स.स.
(८) श्रीमती मनिषा चौधरी, वि.स.स.
(९) श्रीमती देवयानी फरांदे, वि.स.स.
(१०) डॉ. भारती लव्हेकर, वि.स.स.
(११) ॲड. राहूल नार्वेकर, वि.स.स.
(१२) श्रीमती सरोज अहिरे, वि.स.स.
(१३) श्रीमती यामिनी यशवंत जाधव, वि.स.स.
(१४) श्री. रईस शेख, वि.स.स.
(१५) श्रीमती श्वेता महाले, वि.स.स.
(१६) श्री. शशिकांत शिंदे, वि.प.स.
(१७) श्री. विजय उर्फ भाई गिरकर, वि.प.स.
(१८) श्री. अशोक उर्फ भाई जगताप, वि.प.स.
(१९) श्री. कपिल पाटील, वि.प.स.
(२०) श्री. विनायक मेटे, वि.प.स.
(२१) श्री. अमोल मिटकरी, वि.प.स.

*** दिनांक ५ एप्रिल, २०२१ रोजी गृह मंत्री पदाचा राजीनामा दिल्याने समिती प्रमुखाचे पद रिक्त.**

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. राजेन्द्र भागवत, प्रधान सचिव
(२) श्री. शिवदर्शन साठये, उप सचिव
(३) श्री. सुभाष नलावडे, अवर सचिव
(४) श्री. घ. ज्ञा. देबडवार, अवर सचिव (समिती)
(५) श्री. आनंद तेलंग, सहायक कक्ष अधिकारी.

**मंत्रालयीन अधिकारी :**

(१) श्री. सिताराम कुंटे, अप्पर मुख्य सचिव, गृह विभाग.
(२) श्री. विनित अग्रवाल, प्रधान सचिव, गृह (विशेष) विभाग.
(३) श्री. भूपेन्द्र मु. गुरव, सचिव (विधि विधान) विधि व न्याय विभाग.
(४) श्री. शिरीष मोहोड, उप सचिव, गृह विभाग.
(५) श्रीमती मुग्धा सावंत, उप सचिव, विधि व न्याय विभाग.
(६) श्री. नरेश पुसनाके, अवर सचिव, विधि व न्याय विभाग.

## ** श्री. दिलीप वळसे-पाटील, मा.गृह मंत्री - समिती प्रमुख

**सदस्य :**

(१) श्री. जितेंद्र आव्हाड, मा. गृहनिर्माण मंत्री

(२) ॲड. अनिल परब, मा.संसदीय कार्य मंत्री

(३) श्री. सुरेश वरपुडकर, वि.स.स.

(४) श्री. दिपक केसरकर, वि.स.स.

(५) श्रीमती प्रणिती शिंदे, वि.स.स.

(६) श्रीमती माधुरी मिसाळ, वि.स.स.

(७) श्री. सुनिल प्रभू, वि.स.स.

(८) श्रीमती मनिषा चौधरी, वि.स.स.

(९) श्रीमती देवयानी फरांदे, वि.स.स.

(१०) डॉ. भारती लव्हेकर, वि.स.स.

(११) ॲड. राहूल नार्वेकर, वि.स.स.

(१२) श्रीमती सरोज अहिरे, वि.स.स.

(१३) श्रीमती यामिनी यशवंत जाधव, वि.स.स.

(१४) श्री. रईस शेख, वि.स.स.

(१५) श्रीमती श्वेता महाले, वि.स.स.

(१६) श्री. शशिकांत शिंदे, वि.प.स.

(१७) श्री. विजय उर्फ भाई गिरकर, वि.प.स.

(१८) श्री.अशोक उर्फ भाई जगताप, वि.प.स.

(१९) श्री. कपिल पाटील, वि.प.स.

(२०) श्री. विनायक मेटे, वि.प.स.

(२१) श्री. अमोल मिटकरी, वि.प.स.

**निमंत्रित :**

श्रीमती मनिषा कायंदे, वि.प.स.

** महाराष्ट्र विधानसभेने दिनांक ५ जुलै, २०२१ रोजी संमत केलेल्या प्रस्तावानुसार समिती प्रमुख पदावर नियुक्त.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. राजेन्द्र भागवत, प्रधान सचिव

(२) श्री. शिवदर्शन साठये, उप सचिव

(३) श्री. सुभाष नलावडे, अवर सचिव

(४) श्री. घ. ज्ञा. देबडवार, अवर सचिव (समिती)

(५) श्री. नागसेन बनसोडे, कक्ष अधिकारी

(६) श्री. आनंद तेलंग, सहायक कक्ष अधिकारी.

**मंत्रालयीन अधिकारी :**

(१) श्री. मनुकुमार श्रीवास्तव, अप्पर मुख्य सचिव, गृह विभाग.

(२) श्री. संजय सक्सेना, प्रधान सचिव, गृह (विशेष) विभाग.

(३) श्री. सतीश वाघोले, सचिव (विधि विधान) विधि व न्याय विभाग

(४) श्री. राहूल कुलकर्णी, सह सचिव, गृह विभाग

(५) श्रीमती मुग्धा सावंत, सह सचिव, (प्रभारी) विधि व न्याय विभाग.

(६) श्री. शिरीष मोहोड, उप सचिव, गृह विभाग.

(७) श्री. न. मो. पुसनाके, अवर सचिव, विधि व न्याय विभाग.

## सन २०२० चे विधानसभा विधेयक क्रमांक ५१.—शक्ती फौजदारी कायदे (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०२० यावरील संयुक्त समितीचा अहवाल

**या संयुक्त समितीकडे सन २०२० चे विधानसभा विधेयक क्रमांक ५१.—**शक्ती फौजदारी कायदे (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०२० विचारार्थ पाठविण्यात आले होते. त्या समितीचा प्रमुख या नात्याने समितीच्या वतीने अहवाल सादर करण्यास प्राधिकृत करण्यात आले असून मी हा अहवाल या सोबत जोडलेल्या समितीने सुधारणा केलेल्या विधेयकासह सादर करीत आहे.

हे विधेयक दिनांक १५ डिसेंबर, २०२० रोजी विधानसभेत मांडण्यात आले होते. सदरहू विधेयक दोन्ही सभागृहाच्या संयुक्त समितीकडे विचारार्थ पाठविण्यासंबंधातील प्रस्ताव विधानपरिषदेची सहमती मिळाल्यानंतर दिनांक १५ डिसेंबर, २०२० रोजी विधानसभेकडून स्वीकृत करण्यात आला.

समितीने एकूण १२ (बारा) बैठका घेतल्या. विवक्षित प्रारंभिक बाबी निश्चित करण्यासाठी समितीची पहिली बैठक दिनांक २९ डिसेंबर, २०२० रोजी घेण्यात आली. या बैठकीत समितीने दोन्ही सभागृहाच्या सदस्यांकडून व जनतेकडून दिनांक १५ जानेवारी, २०२१ पर्यंत सुधारणा/सूचना मागविण्याचा निर्णय घेतला. त्यासाठी सन्माननीय विधीमंडळ सदस्यांना पत्राद्वारे व राज्यातील जनतेला अग्रगण्य वर्तमानपत्रातील जाहीरातीद्वारे अवगत करण्यात आले. समितीने दिनांक ११ जानेवारी, २०२१ रोजी नागपूर व दिनांक २९ जानेवारी, २०२१ रोजी औरंगाबाद येथे आयोजित बैठकीत त्या त्या विभागातील महिला संघटनांच्या प्रतिनिधी व उच्च न्यायालयाच्या बार आसोसिएशन तसेच सत्र न्यायालयाच्या वकिल संघटना यांच्या सोबत बैठक घेऊन प्रस्तावित विधेयक अधिक सक्षम व प्रभावी होण्याच्या दृष्टीने त्यांची मते जाणून घेतली. दिनांक १९ जानेवारी, २०२१ रोजी मुंबई येथे आयोजित करण्यात आलेल्या बैठकीत डॉ. निलम गोऱ्हे, मा.उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे महिला सबलीकरणातील योगदान व तळमळ विचारात घेता आवर्जून विधेयकाबाबत तज्ज्ञ अभिमत जाणून घेतले तसेच मुंबईतील महिला संघटनांच्या प्रतिनिधी व उच्च न्यायालयाच्या बार आसोसिएशन व शहर दिवाणी आणि सत्र न्यायालयाच्या वकिल संघटना यांच्या सोबत बैठक घेतली व विधेयकाबाबत सूचना/सुधारणा जाणून घेतल्या. सदहू विधेयकाचा मसूदा तयार करण्यात महत्वाची भूमिका बजावणाऱ्या श्रीमती अस्वती दोरजे, सह पोलीस आयुक्त, नागपूर यांचे समवेत देखील समितीने विचारविनिमय केला. तसेच फौजदारी स्वरुपाच्या गुन्ह्यांच्या तपासाचा अनुभव असणाऱ्या शहरी व ग्रामीण भागातील तपास अधिकाऱ्यांसमवेत देखील समितीने चर्चा करून त्यांची मते आजमावून घेतली. सदरहू संयुक्त समितीच्या दिनांक २९ डिसेंबर, २०२०, ५ जानेवारी, ११ जानेवारी, १९ जानेवारी, २९ जानेवारी, २२ फेब्रुवारी, २२ जुलै, २८ सप्टेंबर, २९ सप्टेंबर, २१ ऑक्टोबर व १८ नोव्हेंबर, २०२१ अशा एकूण अकरा बैठका संपन्न होऊन उक्त बैठकांमध्ये समितीने सर्व संबंधितांकडून प्राप्त झालेल्या विविध सूचना/सुधारणा विचारात घेऊन विधेयकावर खंडनिहाय विचार केला व त्यानुसार विधेयकात करावयाच्या सुधारणांना अंतिम स्वरुप दिले. समितीने दिनांक २ डिसेंबर, २०२१ रोजी झालेल्या बैठकीत हा अहवाल सुधारणांसह स्वीकृत केला.

### अहवाल

विधेयकाच्या विविध खंडामधील सुधारणा संबंधातील समितीचे अभिप्राय पुढील परिच्छेदात तपशिलवार दिले आहेत.

प्रचलित कार्यपद्धतीनुसार विधेयकाच्या हेतूवाक्यात भारतीय गणराज्याचा, म्हणजेच राज्यघटनेने दिनांक २६ जानेवारी, १९५० रोजी, देशास गणराज्य घोषित केल्यापासून नेमक्या कितव्या वर्षात उक्त विधेयक अधिनियमित करावयाचे योजिले आहे त्या वर्षांच्या सांखिक क्रमाचा उल्लेख असतो. प्रस्तुत विधेयक सन २०२० मधील असून त्याअनुषंगाने हेतूवाक्यात "एकाहत्तराव्या" असा उल्लेख आहे. तथापि, विद्यमान सन २०२१ असल्याने समितीच्या मते विधेयकातील हेतूवाक्यात "बाहत्तराव्या" अशी सुधारणा करणे आवश्यक असल्याने त्यानुसार हेतूवाक्यात सुधारणा करण्यात आली आहे.

**खंड १ :** या खंडामध्ये विधेयकाचे संक्षिप्त नाव, सन, व्याप्ती व प्रारंभ याबाबतची माहिती देण्यात आली आहे.

उप-खंड (१) मध्ये "शक्ती फौजदारी कायदे (महाराष्ट्र सुधारणा) अधिनियम, २०२०" अशी शब्दयोजना करण्यात आली आहे.

सदर विधेयक सन २०२० मध्ये विधानसभा सभागृहात पुर:स्थापित झालेले आहे व त्यानंतर दोन्ही सभागृहांच्या संयुक्त समितीकडे दिनांक १५ डिसेंबर, २०२० रोजी अहवाल सादर करण्यासाठी सोपविण्यात आलेले आहे. समितीने अद्याप आपला अहवाल सादर केला नसल्याने सन २०२१ चा अंतर्भाव असणारी तांत्रिक सुधारणा आवश्यक असल्याने त्यानुसार या उप-खंडात सुधारणा करण्यात आली आहे.

**खंड ३ :** या खंडामध्ये पोलीस अन्वेषणाकरिता विदा (डेटा) पुरविण्यास कसूर झाल्यास होणाऱ्या शिक्षेची तरतूद करण्यात आली आहे.

प्रस्तुत खंडात महिलांसंदर्भातील विनिर्दिष्ट गुन्ह्यांचा तपास करत असताना अन्वेषण अधिकाऱ्याने मागणी केल्यास, समाज माध्यम व्यासपीठ किंवा आंतरजाल किंवा चलदूरभाषा संदेशवहन प्रणाली (मोबाईल टेलीफोनी) विदा (डेटा) पुरवठादार यांनी ०७ दिवसांच्या आत विदा (डेटा) देण्याबाबतची व तसे करण्यास कसुरी झाल्यास शिक्षेची तरतूद करण्यात आली आहे. समितीने विहित कालावधीत डेटा पुरविण्यात कसूर करणाऱ्यास विधेयकात प्रस्तावित करण्यात आलेली एक महिन्यापर्यंतच्या कारावासाची शिक्षा पुरेशी नसून ती तीन महिन्यांपर्यंत इतकी करण्याबाबतचा निर्णय घेतला. त्यानुसार **"एक महिन्यापर्यंत"** या शब्दाऐवजी **"तीन महिन्यापर्यंत"** अशी सुधारणा करण्यात आली आहे.

समितीच्या मते असे ठरले की, **" चलदूरभाषा संदेशवहन "** तसेच **" आंतरजाल "** व **" विदा "** हे शब्द बोली भाषेत तितकेसे प्रचलित नसून उच्चारण्यास व अर्थबोध होण्यास क्लिष्ट आहेत. अधिनियमातील तरतुदी अन्वयार्थाच्या अनुषंगाने स्पष्ट व सुटसुटीत असाव्यात या कारणास्तव प्रस्तुत खंडात **" आंतरजाल किंवा चलदूरभाषा संदेशवहन प्रणाली (मोबाईल टेलिफोनी) विदा (डेटा) "** हा मजकूर वगळून त्याऐवजी **" इंटरनेट किंवा मोबाईल टेलिफोनी डेटा "** तसेच **" वीजकीय (इलेक्ट्रॉनिक)"** या शब्दाऐवजी **" इलेक्ट्रॉनिक"** अशी सुधारणा सदर खंडात समितीने प्रस्तावित केली. त्यानुसार त्यात सुधारणा करण्यात आली आहे. त्यानुसार परिणामस्वरुप सुधारणा म्हणून समास टिपेमध्ये नमूद **" विदा (डेटा) "** हा मजकूर वगळून त्याऐवजी **" डेटा "** हा मजकुर दाखल करण्याची सुधारणा प्रस्तावित करण्यात आली आहे.

गुन्हयाचा तपास लवकरात लवकर संपविण्याचा प्रस्तुत विधेयकाचा उद्देश विचारात घेता, अन्वेषण अधिकाऱ्यास डेटा देण्याचा कालावधी **" सात "** दिवसांऐवजी **" तीन "** दिवस करण्यात यावा आणि असा डेटा पुरविण्यात कसुर झाल्यास, संबंधितांना जरब बसण्याच्या दृष्टीकोनातून **" पाच "** लाखांऐवजी **" पंचवीस "** लाखांच्या द्रव्यदंडाची शिक्षा प्रस्तावित करण्याबाबतची सुधारणा सदर खंडात समितीने प्रस्तावित केली. त्यानुसार त्यात सुधारणा करण्यात आली आहे.

**खंड ४ :** या खंडामध्ये खोटी तक्रार केल्यास किंवा लोकसेवकास विवक्षित अपराधांची खोटी माहिती दिल्यास संबंधीतास एक वर्षापर्यंत असू शकेल इतक्या साध्या कारावासाची किंवा द्रव्यदंड अथवा दोन्ही शिक्षेची तरतूद करण्यात आली आहे.

त्याअनुषंगाने समितीच्या मते असे ठरले की, महिला सबलीकरण तथा सक्षमीकरणाचा भाग म्हणून महिला अत्याचारांबाबत प्रस्तुत विधेयकाव्दारे विद्यमान तरतूदी अधिक कठोर करण्यात येत आहेत. त्यानुसार गुन्हेगारांना शासन होणे व कायदयाचा धाक निर्माण होणे अपेक्षित आहे. तथापि, निरपराधांना कायदयाचा अनावश्यक जाच न होता कायदयाचे अभय असणे गरजेचे आहे. ज्या व्यक्तीविरुद्ध चुकीची अथवा खोटी तक्रार करण्यात आलेली आहे, अशा व्यक्तीची पणाला लागणारी सामाजिक प्रतिष्ठा तसेच त्यांस होणारा नाहक मनस्ताप विचारात घेता, विविध कारणांनी चुकीच्या अथवा खोट्या तक्रारी करणाऱ्या व्यक्तींनाही कडक शिक्षेची तरतूद असणे आवश्यक आहे. विधेयकातील प्रस्तावित तरतूदीन्वये खोट्या तक्रारी करणाऱ्या व्यक्तीस एक वर्षापर्यंत साध्या कारावासाची शिक्षा प्रस्तावित आहे. त्याअंतर्गत गुन्हा सिद्ध झालेल्या व्यक्तीस किमान एक दिवसाचीही शिक्षा होऊ शकते व उक्त शिक्षा गुन्ह्याचे स्वरुप व त्याचे होणारे परिणाम विचारात घेता नगण्य असल्याचे वाटते. तसेच प्रस्तुत तरतूदीमध्ये द्रव्यदंडाचीही नेमकी रक्कम नमूद करण्यात आलेली नाही. त्याशिवाय प्रस्तुत तरतूदीमध्ये कारावास अथवा द्रव्यदंड किंवा दोन्ही शिक्षा प्रस्तावित केलेल्या आहेत. या पार्श्वभूमिवर शिक्षेचा कालावधी किमान एक वर्षापासून ते तीन वर्षांपर्यंत व द्रव्यदंडाची रक्कम रुपये ०१ लक्ष इतकी निश्चित करण्याचा व दोन्ही शिक्षा लागू करण्याबाबतची सुधारणा करण्याचा निर्णय समितीने घेतला. त्यानुसार या खंडात **" एका वर्षापर्यंत असू शकेल "** या मजकुराऐवजी **" एका वर्षापेक्षा कमी नसेल परंतू तीन वर्षांपर्यंत असू शकेल "** आणि **" किंवा द्रव्यदंडाच्या किंवा दोन्ही "** या मजकूरा ऐवजी **" एक लाख रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाच्या "** अशी सुधारणा प्रस्तावित करण्यात आली आहे.

**खंड ६ :** या खंडामध्ये महिलांवर होणाऱ्या ॲसिड हल्ल्याबाबतच्या विवक्षित गुन्हयांसाठी शिक्षा नमूद करण्यात आल्या आहेत.

उप-खंड (क) मधील (क) महिलांविरोधात होणाऱ्या ॲसिड हल्ल्याशी संबंधीत असून गुन्हा सिद्ध झाल्यास यापूर्वीची दहा वर्षांची शिक्षा असलेल्या तरतूदीबाबत समितीने अत्यंत गांभीर्यपूर्वक विचारविनिमय करून महिलांवरील वाढत्या ॲसिड हल्ल्याच्या घटनांच्या पार्श्वभूमिवर संबंधितांना अत्यंत जबर शिक्षा होण्याबाबतचे मत व्यक्त करून सदरची शिक्षा पुरेशी नसल्याचे नमूद करून उक्त शिक्षा किमान पंधरा वर्ष व गुन्ह्याचे गांभीर्य पाहता आजीवन कारावासाची शिक्षा आणि द्रव्यदंडाची शिक्षा प्रस्तावित करण्याबाबत आवश्यकता नमूद केली.

त्यानुसार समितीने **" ती व्यक्ती, दहा वर्षांपेक्षा कमी नसेल "** या मजकूराने सुरू होणाऱ्या व **" आणि द्रव्यदंडाच्या शिक्षेस प्राप्त असेल "** या मजकूराने संपणाऱ्या मजकूराऐवजी, **" ती व्यक्ती, पंधरा वर्षांपेक्षा कमी नसेल परंतु, अशा व्यक्तीच्या उर्वरित नैसर्गिक जीवनाच्या काळापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाच्या आणि द्रव्यदंडाच्या शिक्षेस पात्र असेल "** अशी सुधारणा प्रस्तावित केली.

उप-खंड (क) मधील (ख) मध्ये ॲसिड इत्यादिचा वापर करून जबर दुखापत करणाऱ्या गुन्हयांमध्ये पिडीत व्यक्तीस वैद्यकीय उपचारार्थ आरोपीकडून द्रव्यदंड आकारुन सदरचा खर्च भागविण्याची तरतूद आहे. ॲसिड हल्ल्यात चेहऱ्याचे विद्रुपीकरण होत असल्याने सदरच्या उपखंडात **" सुघटन शल्यचिकित्सा व मुखपुनर्रचना यांच्या खर्चासह "** ही सुधारणा विधेयकात प्रस्तावित आहे.

समितीच्या मते असे ठरले की, **" सुघटन शल्यचिकित्सा व मुखपुनर्रचना यांच्या खर्चासह "** अशी शब्दरचना सर्वसामान्यपणे आकलन होण्यास क्लिष्ट असून रुढ बोलीभाषेत सदर शब्दांचा उपयोग सहसा होत नसल्याने त्याऐवजी सर्वसाधारणपणे रुढ असलेले व ठळकपणे अर्थबोध होणारे **" प्लॅस्टीक सर्जरी "** हे शब्द दाखल करण्याबाबतची सुधारणा करण्याचा निर्णय समितीने घेतला. त्यानुसार या खंडात सुधारणा करण्यात आली आहे.

**खंड ८ :** या खंडामध्ये महिलेचा विनयभंग करण्याशिवाय संदेशवहनाच्या कोणत्याही साधनाद्वारे तिला धाकदपटशा दाखवणे याप्रकारचे कृत्य करण्याऱ्यास होणाऱ्या शिक्षेची तरतूद करण्यात आली आहे.

सदर खंडामध्ये महिलेचा विनयभंग करण्याशिवाय दूरध्वनीद्वारे, ई-मेलद्वारे, समाजमाध्यमांद्वारे किंवा संदेशवहनाच्या इतर कोणत्याही वीजकीय (इलेक्ट्रॉनिक किंवा डिजीटल) माध्यमांमार्फत क्षोभकारी संभाषण करणे, धमकी देणे, बदनामी करणे, प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे कोणत्याही साधनांमार्फत महिलेचा विनयभंग होईल अशा प्रकारचे कृत्य करणाऱ्यास शिक्षेची तरतूद करण्यात आली आहे.

" **वीजकीय (इलेक्ट्रॉनिक किंवा डिजीटल)** " या मजकूराऐवजी " **इलेक्ट्रॉनिक किंवा डिजीटल** " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

समितीच्या मते असे ठरले की, सदर खंडातील उप कलम(१) मध्ये " **जो कोणी** " या संज्ञेबाबत भारतीय दंड विधान या मूळ कायद्यात इंग्रजी मध्ये " Whoever " असे नमूद केलेले आहे. तथापि, मराठी भाषेमध्ये " **जो कोणी** " यात स्त्री किंवा पुरुष वा अन्य कोण समाविष्ट होतो याबाबत समितीने बराच खल केला व त्यानुसार **" जो कोणी "** या शब्दांचा अर्थ अधिक स्पष्ट होण्याच्या दृष्टीने पुरूष, स्त्री किंवा ट्रान्सजेंडर अशी शब्दरचना त्यात येणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन केले.

त्यानुसार समितीने " **जो कोणी** " या संज्ञेचा अर्थ " **पुरुष, स्त्री किंवा ट्रान्सजेंडर** " असा असेल अशी सुधारणा प्रस्तावित केली.

**खंड १२** : या खंडामध्ये विनिर्दिष्ट गुन्ह्यांचा तपास करत असताना अन्वेषण अधिकाऱ्याने मागणी केल्यास समाजमाध्यम व्यासपीठ किंवा आंतरजाल किंवा चलदूरभाषा संदेश वहन प्रणाली (मोबाईल टेलीफोनी) विदा (डेटा) पुरविणे बंधनकारक असेल अशी तरतूद करण्यात आली आहे.

समितीच्या मते असे ठरले की, " **चलदूरभाषा संदेशवहन**" तसेच " **आंतरजाल** " **व** " **विदा** " हे शब्द बोली भाषेत तितकेसे प्रचलित नसून उच्चारण्यास व अर्थबोध होण्यास क्लिष्ट आहेत. अधिनियमातील तरतूदी अन्वयार्थाच्या अनुषंगाने स्पष्ट व सुटसुटीत असाव्यात या कारणास्तव **" आंतरजाल किंवा चलदूरभाषा संदेशवहन प्रणाली (मोबाईल टेलिफोनी) विदा (डेटा)** " हा मजकूर वगळून त्याऐवजी **" इंटरनेट किंवा मोबाईल टेलिफोनी डेटा "** तसेच " **वीजकीय (इलेक्ट्रॉनिक)** " या शब्दाऐवजी " **इलेक्ट्रॉनिक** " अशी सुधारणा सदर खंडात समितीने प्रस्तावित केली त्यानुसार त्यात सुधारणा करण्यात आली आहे.

**खंड १६ :** या खंडात नमूद गुन्ह्यांचा तपास करत असताना ज्या दिनांकास खबर नोंदविली होती त्या दिनांकापासून पंधरा दिवसांच्या कामकाजाच्या कालावधीत अन्वेषण अधिकाऱ्याकडून अन्वेषण पूर्ण करण्यात येईल अशी तरतूद करण्यात आली आहे.

प्रस्तुत खंडात नमूद गुन्ह्यांचा तपास करत असताना ज्या दिनांकास खबर नोंदविली होती त्या दिनांकापासून पंधरा दिवसांच्या कामकाजाच्या कालावधीत अन्वेषण अधिकाऱ्याने अन्वेषण पूर्ण करण्याची तरतूद करण्यात आली आहे. तसेच नमूद कालावधीत अन्वेषण अधिकाऱ्यास अन्वेषण करणे शक्य होत नसेल त्याची कारणे लेखी स्वरुपात नोंदविण्यात येतील व यानंतर वरिष्ठ अधिकाऱ्यास अन्वेषणाचा कालावधी सात कामकाजाच्या दिवसापर्यंत वाढविता येईल अशी तरतूद करण्यात आली आहे.

त्याअनुषंगाने समितीने यासंदर्भात सर्वंकष चर्चा केली. तसेच समितीच्या बैठकीमध्ये शहरी व ग्रामीण भागातील तपासी अधिकाऱ्यांना पाचारण करण्यात आले व प्रत्यक्ष काम करताना त्यांना येणाऱ्या समस्या जाणून घेण्यात आल्या व विचारविनिमय करून समितीने असे ठरवले की, मूळ कायद्यामध्ये अन्वेषणाचा जो ६० दिवसांचा कालावधी आहे तो कमी केल्यास त्याचा तपासाच्या गुणवत्तेवर परिणाम होऊ शकेल. म्हणून याबाबतीतील कालावधी आहे तसाच कायम ठेवण्यात यावा व १५ दिवसांच्या कालावधीची जी दुरुस्ती या खंडाद्वारे सुचविलेली आहे त्यामध्ये सुधारणा करण्यात यावी. तथापि, मूळ अधिनियमानुसार अन्वेषणाचा ६० दिवसांचा कालावधी विभागण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार महिलांवरील गुन्ह्यांचे अन्वेषण तत्परतेने होण्यासाठी ३० दिवसांत अन्वेषण पूर्ण करण्याबाबत व विशिष्ट परिस्थितीत अन्वेषणाचा कालावधी वरिष्ठांच्या अनुमतीने आणखी ३० दिवस वाढविण्याबाबत म्हणजेच एकूण ६० दिवसांचा अन्वेषणाचा कालावधी अटीसह मान्य करावयाचा निर्णय घेतला. त्यानुसार या खंडात **"पंधरा कामकाजाच्या दिवसांच्या"** या मजकुराऐवजी **"तीस दिवसांच्या कालावधीत"** आणि **"सात कामकाजाच्या दिवसांपर्यंत"** या मजकूराऐवजी **"तीस दिवसांपर्यंत"** अशी सुधारणा प्रस्तावित करण्यात आली आहे.

**खंड २२ :** विधेयकातील खंड २२ मध्ये फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४३८ मध्ये सुधारणा प्रस्तावित करण्यात आलेल्या आहेत. त्यामध्ये माहिला अत्याचारासंदर्भातील गुन्ह्यांमध्ये अटकपूर्व जामीनाची तरतूद रद्द करण्याची सुधारणा प्रस्तावित आहे. सद्यस्थितीत सदरील गुन्ह्यांमधील आरोपीला अटकपूर्व जामीन मिळण्याची तरतूद आहे. समितीने उक्त खंडावर साधकबाधक विचार करून सदरील गुन्ह्यांतील आरोपींना सरसकट अटकपूर्व जामीन नाकारण्यातून काय परिणाम होऊ शकतात तसेच सदर कलमाचा जाणीवपूर्वक संभाव्य गैरवापर किंवा एखाद्या प्रकरणात पुरेसे पुरावे नसल्यास अटकपूर्व जामीन नाकारण्याची बाब, आरोपीस गुन्हा सिद्ध होण्यापूर्वी उपलब्ध असलेल्या मुलभूत अधिकारांशी सुसंगती व प्रस्तुत तरतुदीची कायदेशीर विधिग्राह्यता याबाबत, समितीच्या निर्णयानुसार, ज्येष्ठ विधिज्ञांचे अभिमत जाणून घेण्यात आले. त्याअनुषंगाने त्यांनी अटकपूर्व जामीनाची तरतूद रद्दबातल करणे अप्रस्तुत ठरेल तसेच उक्त तरतुदीचा संभाव्य गैरवापर होण्याची भिती व्यक्त करून मा. [illegible] (Sustain) दाट शंका व्यक्त केली. सदरील अभिमत जाणून घेतल्यानंतर समितीने खंड २२ वगळण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार त्यात सुधारणा करण्यात आली आहे.

**खंड २४ : प्रस्तुत खंडातील सुधारणा या खंड ३, ४ व ६ मध्ये केलेल्या सुधारणांच्या परिणामस्वरुप आहेत.**

**खंड ३१ :** या खंडामध्ये बालकांचे लैंगिक अत्याचार संरक्षण या केंद्रीय अधिनियमात राज्यापुरती सुधारणा प्रस्तावित करण्यात आली आहे. यामध्ये बालकांवरील लैंगिक अत्याचारासंदर्भातील गुन्ह्यांमध्ये समाजमाध्यमांशी संबधित माहिती असल्यास ती ०७ दिवसांमध्ये गुन्हा अन्वेषण अधिकाऱ्यास देण्याबाबत तरतूद करण्यात आली आहे. समितीने उक्त माहिती पुरविण्याचा कालावधी ०७ दिवसांऐवजी ०३ दिवस इतका प्रस्तावित केलेला आहे. सदर माहिती ०३ दिवसांत गुन्हा अन्वेषण अधिकाऱ्यास प्राप्त न झाल्यास संबंधित दोषींना एक महिन्यापर्यंतचा कारावास अशी शिक्षा विधेयकात प्रस्तावित करण्यात आली आहे.

समितीने याबाबत सर्वंकष विचारविनिमय करून शिक्षेचा कालावधी एक महिन्यापर्यंत ठेवल्यास प्रत्यक्षात आरोपीस अगदी ०१ दिवसाची शिक्षा देखील मिळू शकते व त्यातून आरोपींना जरब बसविण्याचा प्रस्तुत विधेयकाचा हेतू असफल होऊ शकतो असा विचार केला व त्यानुसार शिक्षेचा कालावधी किमान ०१ ते ०६ महिन्यांपर्यंत/१ वर्षापर्यंत असावा काय, गुन्ह्याची तीव्रता व गांभीर्य विचारात घेऊन प्रत्यक्षातील शिक्षेचा कालावधी प्रकरणपरत्वे मा. न्यायालयावर सोपविणे उचित ठरेल किंवा कसे आणि शिक्षेचा किमान कालावधी निश्चित असावा काय व असल्यास, शिक्षेचा कालावधी किती असावा याबाबत, समितीच्या निर्णयानुसार, ज्येष्ठ विधिज्ञांचे अभिमत जाणून घेण्यात आले. त्यानुसार त्यांनी विहित कालावधीत डेटा पुरविण्यात कसूर करणाऱ्यास विधेयकात प्रस्तावित करण्यात आलेली एक महिन्यापर्यंतच्या कारावासाची शिक्षा पुरेशी असून त्यात वाढ करण्याची आवश्यकता नसल्याचे नमूद केले. तथापि, समितीने विहित कालावधीत डेटा पुरविण्यात कसूर करणाऱ्यास विधेयकात प्रस्तावित करण्यात आलेली एक महिन्यापर्यंतच्या कारावासाची शिक्षा पुरेशी नसून ती तीन महिन्यांपर्यंत इतकी करण्याबाबतचा निर्णय घेतला. त्यानुसार **"एक महिन्यापर्यंत"** या शब्दाऐवजी **"तीन महिन्यांपर्यंत"** अशी सुधारणा करण्यात आली आहे.

समितीच्या मते असे ठरले की, " **चलदूरभाषा संदेशवहन** " तसेच " **आंतरजाल** " **व** " **विदा** " हे शब्द बोली भाषेत तितकेसे प्रचलित नसून उच्चारण्यास व अर्थबोध होण्यास क्लिष्ट आहेत. अधिनियमातील तरतुदी अन्वयार्थाच्या अनुषंगाने स्पष्ट व सुटसुटीत असाव्यात या कारणास्तव " **आंतरजाल किंवा चलदूरभाषा संदेशवहन प्रणाली (मोबाईल टेलिफोनी) विदा (डेटा)** " हा मजकूर वगळून त्याऐवजी **"इंटरनेट किंवा मोबाईल टेलिफोनी डेटा** " तसेच " **वीजकीय (इलेक्ट्रॉनिक)** " या शब्दाऐवजी " **इलेक्ट्रॉनिक** " अशी सुधारणा सदर खंडात समितीने प्रस्तावित केली त्यानुसार त्यात सुधारणा करण्यात आली आहे.

समितीच्या मते असे ठरले की, अन्वेषण अधिकाऱ्याने मागणी केल्यास, अन्वेषण अधिकाऱ्यास डेटा देण्याचा कालावधी " **सात** " दिवसांऐवजी " **तीन** " दिवस करण्यात यावा आणि असा डेटा पुरविण्यात कसूर झाल्यास, संबंधितांना जरब बसण्याच्या दृष्टीकोनातून " **पाच** " लाखांऐवजी " **पंचवीस** " लाखांच्या द्रव्यदंडाची शिक्षा प्रस्तावित करण्याबाबतची सुधारणा सदर खंडात समितीने प्रस्तावित केली. त्यानुसार त्यात सुधारणा करण्यात आली आहे.

विधेयकाच्या इतर खंडात समितीने केलेले बदल गौण स्वरुपाचे परिणामस्वरुप किंवा निव्वळ मसुद्याच्या दृष्टीने केलेले आहेत.

**विधान भवन :**

मुंबई.

दिनांक ०२ डिसेंबर, २०२१.

**श्री. दिलीप वळसे-पाटील,**

समिती प्रमुख.

[टीप.—संयुक्त समितीने वगळलेला मजकूर चौकोनी कंसात दर्शविला आहे आणि जादा दाखल केलेला मजकूर एकतर अधोरेखित केला आहे किंवा पार्श्वरेखित केला आहे.]

**L. A. BILL No. LI OF 2020.**

*A BILL*

FURTHER TO AMEND THE INDIAN PENAL CODE, THE CODE OF CRIMINAL PROCEDURE, 1973 AND THE PROTECTION OF CHILDREN FROM SEXUAL OFFENCES ACT, 2012, IN THEIR APPLICATION TO THE STATE OF MAHARASHTRA.

**सन २०२० चे विधानसभा विधेयक क्रमांक ५१.**

**भारतीय दंड संहिता, फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ व लैंगिक अपराधांपासून बालकांचे संरक्षण अधिनियम, २०१२ हे, महाराष्ट्र राज्यास लागू असताना, त्यांमध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक.**

**(संयुक्त समितीने सुधारणा केल्याप्रमाणे.)**

१८६० चा ४५. १९७४ चा २. २०१२ चा ३२.

**ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, भारतीय दंड संहिता, फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ व लैंगिक अपराधांपासून बालकांचे संरक्षण अधिनियम, २०१२ हे, महाराष्ट्र राज्यास लागू असताना, त्यांमध्ये आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या [एकाहत्तराव्या] बाहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

## प्रकरण एक

## प्रारंभिक

संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, शक्ती फौजदारी कायदे (महाराष्ट्र सुधारणा) अधिनियम, [२०२०,] २०२१ असे म्हणावे.

(२) तो, संपूर्ण महाराष्ट्र राज्यास लागू असेल.

(३) तो, राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, नियत करील अशा दिनांकास अंमलात येईल.

## प्रकरण दोन

## भारतीय दंड संहिता, याच्या सुधारणा

सन १८६० चा अधिनियम क्रमांक ४५ याच्या कलम १६६क ची सुधारणा.

**२.** भारतीय दंड संहिता, महाराष्ट्र राज्यास लागू असताना (यात यापुढे, या प्रकरणात, ज्याचा निर्देश, " दंड संहिता " असा केला आहे), याच्या कलम १६६क मधील,— (१८६० चा ४५.)

(१) खंड (ग) मध्ये " कसूर करील " या मजकुरानंतर, " ; किंवा " हा मजकूर जादा दाखल करण्यात येईल ;

(२) खंड (ग) नंतर, पुढील खंड जादा दाखल करण्यात येईल :—

" (घ) फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ याच्या कलम १०० अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे, कलम ३२६क, कलम ३२६ख, कलम ३७६, कलम ३७६क, कलम ३७६कख, कलम ३७६ख, कलम ३७६ग, कलम ३७६घ, कलम ३७६घक, कलम ३७६घख किंवा कलम ३७६ङ यांखालील शिक्षापात्र अपराधांचे अन्वेषण करताना, पोलीस अधिकाऱ्याने दिलेल्या विनिर्दिष्ट निदेशांचे पालन करण्यात बुद्धिपुरस्सर कसूर करील, ". (१९७४ चा २.)

सन १८६० चा अधिनियम क्रमांक ४५ यात कलम १७५क समाविष्ट करणे.

**३.** दंड संहितेच्या कलम १७५ नंतर, पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :—

पोलीस अन्वेषणाकरिता [विदा (डेटा)] डेटा पुरविण्यास कसूर करणे.

" **१७५क.** त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी, कोणताही मध्यस्थ किंवा परिरक्षक यांसह जो कोणतेही समाज माध्यम व्यासपीठ किंवा [आंतरजाल किंवा चलदूरभाषा संदेशवहन प्रणाली (मोबाईल टेलिफोनी) विदा (डेटा)] इंटरनेट किंवा मोबाईल टेलिफोनी डेटा पुरवठादार, कलम ३२६क, कलम ३२६ख, कलम ३५४, कलम ३५४क, कलम ३५४ख, कलम ३५४ग, कलम ३५४घ, कलम ३५४ङ, कलम ३७६, कलम ३७६क, कलम ३७६कख, कलम ३७६ख, कलम ३७६ग, कलम ३७६घ, कलम ३७६घक, कलम ३७६घख किंवा कलम ३७६ङ याखालील शिक्षापात्र असलेल्या अपराधाचे अन्वेषण करण्याच्या प्रयोजनार्थ, अन्वेषण अधिकाऱ्याने मागणी केल्याप्रमाणे, त्यास, अशी मागणी मिळाल्यापासून कामकाजाच्या [सात] तीन दिवसांच्या कालावधीत, असा दस्तऐवज व [वीजकीय (इलेक्ट्रॉनिक)] इलेक्ट्रॉनिक अभिलेख यांसह अशी कोणतीही [विदा (डेटा)] डेटा पुरविण्यास कसूर करील, तो, [एक] तीन महिन्यापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या साध्या कारावासाच्या किंवा [पाच] पंचवीस लाख रुपये इतक्या द्रव्यदंडाच्या, किंवा दोन्ही शिक्षेस पात्र असेल.".

सन १८६० चा अधिनियम क्रमांक ४५ यात कलम १८२क समाविष्ट करणे.

**४.** दंड संहितेच्या कलम १८२ नंतर, पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :—

खोटी तक्रार केल्याबद्दल किंवा लोकसेवकास विवक्षित अपराधांची खोटी माहिती दिल्याबद्दल शिक्षा.

**“ १८२क.** जी कोणतीही व्यक्ती, कलम ३२६क, कलम ३२६ख, कलम ३५४, कलम ३५४क, कलम ३५४ख, कलम ३५४ग, कलम ३५४घ, कलम ३५४ङ, कलम ३७६, कलम ३७६क, कलम ३७६कख, कलम ३७६ख, कलम ३७६ग, कलम ३७६घ, कलम ३७६घक, कलम ३७६घख किंवा कलम ३७६ङ याखालील शिक्षापात्र अपराधाच्या बाबतीत अवहेलना करणे, खंडणी उकळणे, धमकावणे किंवा मानहानी करणे किंवा सतावणे या उद्देशाने कोणत्याही व्यक्तीविरुद्ध खोटी तक्रार करील किंवा खोटी माहिती देईल ती व्यक्ती [एका वर्षापर्यंत असू शकेल] एका वर्षापेक्षा कमी नसेल परंतु तीन वर्षापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या साध्या कारावासाच्या [किंवा द्रव्यदंडाच्या, किंवा दोन्ही] आणि एक लाख रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाच्या शिक्षेस पात्र असेल. ”.

सन १८६० चा अधिनियम क्रमांक ४५ याच्या कलम २२८क ची सुधारणा.

**५.** दंड संहितेच्या कलम २२८क मधील, पोट-कलम (१) मध्ये, “ कलम ३७६, कलम ३७६क, ” या मजकुराने सुरू होणाऱ्या आणि “ कलम ३७६ङ ” या मजकुराने संपणाऱ्या मजकुराऐवजी, पुढील मजकूर दाखल करण्यात येईल :—

“ कलम ३२६क, कलम ३२६ख, कलम ३५४, कलम ३५४क, कलम ३५४ख, कलम ३५४ग, कलम ३५४घ, कलम ३५४ङ, कलम ३७६, कलम ३७६क, कलम ३७६कख, कलम ३७६ख, कलम ३७६ग, कलम ३७६घ, कलम ३७६घक, कलम ३७६घख किंवा कलम ३७६ङ ”.

सन १८६० चा अधिनियम क्रमांक ४५ याच्या कलम ३२६क ची सुधारणा.

**६.** दंड संहितेच्या कलम ३२६क मधील,—

[(क) “ ती व्यक्ती, दहा वर्षांपेक्षा कमी नसेल ” या मजकुराने सुरू होणाऱ्या व “ आणि द्रव्यदंडाच्या शिक्षेस पात्र असेल ” या मजकुराने संपणा-या मजकुराऐवजी, पुढील मजकूर दाखल करण्यात येईल :—

(क) “ ती व्यक्ती, दहा वर्षांपेक्षा कमी नसेल परंतु, अशा व्यक्तीच्या उर्वरित नैसर्गिक जीवनाच्या काळापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाच्या आणि द्रव्यदंडाच्या ; किंवा

(ख) ज्या प्रकरणी अपराधाचे वैशिष्ट्य घोर स्वरूपाचे आहे आणि जेथे पुरेसा निर्णायक पुरावा आहे आणि जरब बसविणारी शिक्षा देण्याची खात्री पटेल अशी परिस्थिती आहे अशा प्रकरणी, मृत्यूदंडाच्या, शिक्षेस पात्र असेल ”; ]

“ (क) “ ती व्यक्ती, दहा वर्षांपेक्षा कमी नसेल ” या मजकुराने सुरू होणाऱ्या व “ आणि द्रव्यदंडाच्या शिक्षेस पात्र असेल ” या मजकुराने संपणाऱ्या मजकुराऐवजी, “ ती व्यक्ती, पंधरा वर्षांपेक्षा कमी नसेल परंतु, अशा व्यक्तीच्या उर्वरित नैसर्गिक जीवनाच्या काळापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाच्या आणि द्रव्यदंडाच्या शिक्षेस पात्र असेल ” हा मजकूर दाखल करण्यात येईल ; ” ;

(ख) पहिल्या परंतुकामधील, “ वैद्यकीय उपचाराचा खर्च ” या मजकुराच्या आधी, [“ सुघटन शल्यचिकित्सा] प्लॅस्टीक सर्जरी व मुखपुनर्रचना यांच्या खर्चासह ” हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १८६० चा अधिनियम क्रमांक ४५ याच्या कलम ३२६ख ची सुधारणा.

**७.** दंड संहितेच्या कलम ३२६ख मध्ये, “ सात वर्षांहून कमी नसेल ” या मजकुराने सुरू होणाऱ्या आणि “ सात वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कोणत्याही वर्णनाच्या कारावासाच्या शिक्षेस पात्र असेल ” या मजकुराने संपणाऱ्या मजकुराऐवजी, पुढील मजकूर दाखल करण्यात येईल :—

“ सात वर्षांपेक्षा कमी नसेल परंतु, दहा वर्षांपर्यंत असू येऊ शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाच्या शिक्षेस पात्र असेल ”.

सन १८६० चा अधिनियम क्रमांक ४५ यामध्ये कलम ३५४ङ समाविष्ट करणे.

**८.** दंड संहितेच्या कलम ३५४घ नंतर, पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :—

महिलेचा विनयभंग करण्याशिवाय संदेशवहनाच्या कोणत्याही साधनाद्वारे तिला धाकदपटशा दाखवणे.

“**३५४ङ** जो कोणी, कोणत्याही कृत्याद्वारे, कृतीतून किंवा शब्दांद्वारे एखाद्या महिलेचा विनयभंग करण्याशिवाय तिला धोक्याची, धाकदपटशाची किंवा भीतीची जाणीव निर्माण होईल असे पुढील कृत्यांसह कोणतेही कृत्य जाणीवपूर्वक करील तो, दोन वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कोणत्याही वर्णनाच्या कारावासाच्या शिक्षेस, आणि एक लाख रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाच्या शिक्षेस पात्र असेल :—

(क) जे कामोद्दीपक किंवा स्वैराचारी स्वरूपाचे असेल अशा रीतीने, दूरध्वनीद्वारे, ई-मेलद्वारे, समाजमाध्यमा व्यासपीठाद्वारे किंवा संदेशवहनाच्या अन्य कोणत्याही [वीजकीय (इलेक्ट्रॉनिक किंवा डिजीटल)] इलेक्ट्रॉनिक किंवा डिजीटल मार्गाने क्षोभकारी संभाषण करणे ; किंवा

(ख) त्या महिलेच्या कोणत्याही लैंगिक कृतीतील सहभागासह, त्या महिलेच्या शरीराच्या कोणत्याही भागाचे, इलेक्ट्रॉनिक किंवा इतर कोणत्याही स्वरूपाच्या माध्यमामार्फत वास्तविक किंवा बनावट वर्णनाचा समावेश असलेली कोणतीही ध्वनीफित किंवा चलचित्रफित टाकण्याची (अपलोड) किंवा प्रसारित करण्याची धमकी देणे ; किंवा

(ग) त्या महिलेची बदनामी करण्यासाठी किंवा तिचा दुर्लौकिक करण्यासाठी कोणत्याही स्वरूपातील सामाजिक [वीजकीय (इलेक्ट्रॉनिक)] इलेक्ट्रॉनिक किंवा डिजीटल माध्यमाचा किंवा इतर कोणत्याही माध्यमाचा वापर करणे, किंवा ;

(घ) ज्यामुळे प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे महिलेचा विनयभंग होईल किंवा तिच्या खाजगीपणाचे उल्लंघन होईल अशाप्रकारे तिच्या नावाचा, तपशिलांचा, छायाचित्रांचा किंवा इतर कोणत्याही ओळख साधनांचा वापर करणे.”.

**स्पष्टीकरण.—**या कलमाच्या प्रयोजनार्थ “ जो कोणी ” या संज्ञेचा अर्थ “ पुरूष, किंवा स्त्री किंवा ट्रान्सजेंडर (तृतीयपंथी) ” असा असेल.

सन १८६० चा अधिनियम क्रमांक ४५ याच्या कलम ३७६ ची सुधारणा.

**९.** दंड संहितेच्या कलम ३७६ मध्ये,—

(क) पोट-कलम (१) मधील, “सश्रम कारावासाच्या शिक्षेस पात्र असेल” या मजकुरानंतर “किंवा ज्या प्रकरणी अपराधाचे वैशिष्ट्य घोर स्वरूपाचे आहे आणि जेथे पुरेसा निर्णायक पुरावा आहे आणि जरब बसवणारी शिक्षा देण्याची खात्री पटेल अशी परिस्थिती आहे, अशा प्रकरणी, मृत्युदंडाच्या शिक्षेस पात्र असेल” हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ख) पोट-कलम (२) मध्ये,—

(एक) खंड (च) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :—

“(च-१) कोणत्याही प्रयोजनासाठी वापरलेल्या इमारतीस किंवा इमारतींतील किंवा इमारत संकुलातील,—मग कायद्याद्वारे विनियमित केलेले असो किंवा अन्यथा असो—कोणत्याही सार्वजनिक उपयोगी सेवेस सुरक्षा पुरविण्याच्या किंवा तिची देखभाल करण्याच्या प्रयोजनार्थ असलेला कर्मचारीवर्ग किंवा कंत्राटी कर्मचारी यांसह व्यवस्थापनावर असणारी किंवा व्यवस्थापनाने कामावर ठेवलेली जी कोणी, व्यक्ती, अशा क्षेत्रात एखाद्या महिलेवर बलात्कार करील ती व्यक्ती ; किंवा”;

(दोन) " द्रव्यदंडास देखील पात्र असेल" या मजकुरानंतर, " किंवा ज्या प्रकरणी अपराधाचे वैशिष्ट्य घोर स्वरूपाचे आहे आणि जेथे पुरेसा निर्णायक पुरावा आहे आणि जरब बसवणारी शिक्षा देण्याची खात्री पटेल अशी परिस्थिती आहे अशा प्रकरणी, मृत्युदंडाच्या शिक्षेस पात्र असेल " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ग) पोट-कलम (३) मधील, " आणि द्रव्यदंडाच्या " या मजकुरानंतर, "किंवा ज्या प्रकरणी अपराधाचे वैशिष्ट्य घोर स्वरूपाचे आहे आणि जेथे पुरेसा निर्णायक पुरावा आहे आणि जरब बसवणारी शिक्षा देण्याची खात्री पटेल अशी परिस्थिती आहे अशा प्रकरणी, मृत्युदंडाच्या" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १८६० चा अधिनियम क्रमांक ४५ याच्या कलम ३७६घ ची सुधारणा.

**१०.** दंड संहितेच्या कलम ३७६घ मध्ये, " आणि द्रव्यदंडाच्या देखील " या मजकुरानंतर, "किंवा ज्या प्रकरणी अपराधाचे वैशिष्ट्य घोर स्वरूपाचे आहे आणि जेथे पुरेसा निर्णायक पुरावा आहे आणि जरब बसवणारी शिक्षा देण्याची खात्री पटेल अशी परिस्थिती आहे अशा प्रकरणी, मृत्युदंडाच्या" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १८६० चा अधिनियम क्रमांक ४५ याच्या कलम ३७६घक ची सुधारणा.

**११.** दंड संहितेच्या कलम ३७६घक मध्ये, "आणि द्रव्यदंडाच्या" या मजकुरानंतर "किंवा ज्या प्रकरणी अपराधाचे वैशिष्ट्य घोर स्वरूपाचे आहे आणि जेथे पुरेसा निर्णायक पुरावा आहे आणि जरब बसवणारी शिक्षा देण्याची खात्री पटेल अशी परिस्थिती आहे अशा प्रकरणी, मृत्युदंडाच्या" हा मजकूर जादा दाखल करण्यात येईल.

प्रकरण तीन

## फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ याच्या सुधारणा

१९७४ चा २.

सन १९७४ चा अधिनियम क्रमांक २ यात कलम ३७क समाविष्ट करणे.

**१२.** फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ महाराष्ट्र राज्यास लागू असताना (यात यापुढे, या प्रकरणात, ज्याचा निर्देश, "फौजदारी प्रक्रिया संहिता" असा केला आहे) याच्या कलम ३७ नंतर, पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :—

१८६० चा ४५.

२०१२ चा ३२.

पोलीस अन्वेषणासाठी [विदा (डेटा)] डेटा पुरविणे.

" **३७ क.** कोणताही मध्यस्थ किंवा परिरक्षक यांसह प्रत्येक समाजमाध्यम व्यासपीठ, [आंतरजाल किंवा चलदूरभाष संदेशवहन प्रणाली (मोबाईल टेलिफोनी) विदा (डेटा)] इंटरनेट किंवा मोबाईल टेलिफोनी डेटा पुरवठादाराने, भारतीय दंड संहितेच्या कलम ३२६क, कलम ३२६ख, कलम ३५४, कलम ३५४क, कलम ३५४ख, कलम ३५४ग, कलम ३५४घ, कलम ३५४ङ, कलम ३७६, कलम ३७६क, कलम ३७६ कख, कलम ३७६ख, कलम ३७६ग, कलम ३७६ घ, कलम ३७६ घक, कलम ३७६ घख, किंवा कलम ३७६ ङ यांखालील शिक्षापात्र अपराधांचे किंवा लैंगिक अपराधांपासून बालकांचे संरक्षण अधिनियम, २०१२ खालील कोणत्याही शिक्षापात्र अपराधांचे अन्वेषण करण्याच्या प्रयोजनार्थ, अन्वेषण अधिकाऱ्याच्या मागणीवरून, दस्तऐवज किंवा [वीजकीय (इलेक्ट्रॉनिक) अभिलेखासह विदा (डेटा)] इलेक्ट्रॉनिक अभिलेखासह डेटा पुरविणे बंधनकारक असेल.".

सन १९७४ चा अधिनियम क्रमांक २ याच्या कलम ३९ ची सुधारणा.

**१३.** फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ३९ मधील, पोट-कलम (१) मध्ये,—

(१) खंड (पाच) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येतील :—

" (पाच-१) कलमे ३२६क व ३२६ख (म्हणजे, ॲसिडचा वापर करून आणि ॲसिड फेकण्याचा प्रयत्न करून गंभीर दुखापत करण्याशी संबंधित असलेले अपराध);

(पाच-२) कलम ३५४, कलम ३५४क, कलम ३५४ख, कलम ३५४ग, कलम ३५४घ व कलम ३५४ङ (म्हणजे, संदेशवहनाच्या कोणत्याही साधनांद्वारे महिलेचा विनयभंग करण्याशी, लैंगिक छळवणूक करण्याशी, विवस्त्र करण्याशी, चोरून अश्लील चित्रण करण्याशी, चोरून पाठलाग करण्याशी, छळवणूक करण्याशी संबंधित असलेले महिलांच्या विरुद्धचे अपराध);";

(२) खंड (पाच क) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :—

" (पाच ख) कलम ३७६, कलम ३७६क, कलम ३७६ कख, कलम ३७६ख, कलम ३७६ग, कलम ३७६घ, कलम ३७६ घक, कलम ३७६ घख व कलम ३७६ङ दोन्ही धरून (म्हणजे, बलात्कार व सामूहिक बलात्कार, इत्यादींशी संबंधित असलेले अपराध).".

सन १९७४ चा अधिनियम क्रमांक २ याच्या कलम १०० ची सुधारणा.

**१४.** फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १०० मधील, पोट-कलम (४) मध्ये, पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल :—

१८६० चा ४५.

२०१२ चा ३२.

" परंतु, भारतीय दंड संहितेच्या कलम ३२६ क, कलम ३२६ ख, कलम ३७६, कलम ३७६ क, कलम ३७६कख, कलम ३७६ग, कलम ३७६घ, कलम ३७६घक, कलम ३७६घख किंवा कलम ३७६ङ यांखालील अपराधांच्या बाबतीत किंवा लैंगिक अपराधांपासून बालकांचे संरक्षण अधिनियम, २०१२ यांखालील अपराधांच्या बाबतीत, झडती घेणारी व्यक्ती, झडती घ्यावयाची जागा ज्या ठिकाणी स्थित आहे त्या ठिकाणी जे उपलब्ध आहेत अशा दोन लोकसेवकांना किंवा महाराष्ट्र शासनाच्या महिला व बालकल्याण विभागाने मान्यता दिलेल्या दोन सामाजिक कार्यकर्त्यांना पाचारण करील. जेव्हा साक्षेपी प्रयत्न करूनदेखील असे लोकसेवक उपलब्ध झाले नसतील तेव्हा, झडती घेणारी व्यक्ती, त्याची लेखी नोंद करून या पोट-कलमामध्ये तरतूद केलेली कार्यपद्धती अनुसरील. " .

सन १९७४ चा अधिनियम क्रमांक २ याच्या कलम १६४ ची सुधारणा.

१८६० चा ४५.

**१५.** फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १६४ मधील, पोट-कलम (५क) च्या खंड (क) मध्ये, " भारतीय दंड संहिता याच्या " या मजकुरानंतर, " कलम ३२६क, कलम ३२६ख, " हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल.

सन १९७४ चा अधिनियम क्रमांक २ याच्या कलम १७३ ची सुधारणा.

**१६.** फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १७३ मध्ये,—

(एक) पोट-कलम (१क) मधील, "कलमे ३७६, ३७६क, ३७६कख, ३७६ख, ३७६ग, ३७६घ, ३७६घक, ३७६घख किंवा ३७६ङ" या मजकुराऐवजी "कलम ३७६ख किंवा ३७६ग" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(दोन) पोट-कलम (१क) नंतर, पुढील पोट-कलम समाविष्ट करण्यात येईल :—

१८६० चा ४५.

" (१ख) भारतीय दंड संहिता याच्या कलम ३२६क, कलम ३२६ख, कलम ३७६, कलम ३७६क, कलम ३७६कख, कलम ३७६घ, कलम ३७६घक, कलम ३७६घख किंवा कलम ३७६ङ यांखालील अपराधांच्या संबंधात, पोलीस ठाण्याच्या प्रभारी अधिका-याने ज्या दिनांकास खबर नोंदविली होती त्या दिनांकापासून [पंधरा कामकाजाच्या] तीस दिवसांच्या कालावधीत अन्वेषण पूर्ण करण्यात येईल :

परंतु, ज्या दिनांकास खबर नोंदविण्यात आली होती त्या दिनांकापासून [पंधरा कामकाजाच्या] तीस दिवसांच्या कालावधीत, अन्वेषण पूर्ण करणे शक्य होत नसेल तर, संबंधित अन्वेषण अधिकाऱ्याकडून त्याची कारणे लेखी नोंदविण्यात येतील; अशा प्रसंगांमध्ये, अशा अपराधांच्या आरोपीची ओळख पटविण्याच्या असमर्थतेचा अंतर्भाव करता येईल; यानंतर, संबंधित विशेष पोलीस महानिरीक्षकास किंवा पोलीस आयुक्तास उक्त कालावधी आणखी [सात कामकाजाच्या] तीस दिवसांपर्यंत वाढविता येईल :

परंतु आणखी असे की, या कलमात अंतर्भूत असलेली कोणतीही गोष्ट, या संहितेमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या जामिनाच्या वेगवेगळ्या तरतुदीं कोणताही परिणाम करीत असल्याचे मानण्यात येणार नाही.".

सन १९७४ चा अधिनियम क्रमांक २ याच्या कलम ३०९ ची सुधारणा.

**१७.** फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ३०९ मध्ये, पोट-कलम (१) मधील, परंतुकाऐवजी, पुढील परंतुक दाखल करण्यात येईल :—

१८६० चा ४५.

" परंतु, जेव्हा चौकशी किंवा न्यायचौकशी ही, भारतीय दंड संहितेचे कलम ३२६क, कलम ३२६ख, कलम ३७६, कलम ३७६क, कलम ३७६कख, कलम ३७६ख, कलम ३७६ग, कलम ३७६घ, कलम ३७६घक, कलम ३७६घख, किंवा कलम ३७६ङ यांखालील अपराधांशी संबंधित असेल तेव्हा, अशी चौकशी किंवा न्यायचौकशी, दैनंदिन तत्त्वावर केली जाईल आणि दोषारोपपत्र दाखल केल्याच्या दिनांकापासून तीस कामकाजाच्या दिवसांच्या कालावधीत पूर्ण करण्यात येईल.".

**१८.** फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ३२० मध्ये, पोट-कलम (२) मधील, तक्त्यातील, कलम ३३८शी संबंधित असणाऱ्या नोंदीनंतर पुढील नोंद समाविष्ट करण्यात येईल :— सन १९७४ चा अधिनियम क्रमांक २ याच्या कलम ३२० ची सुधारणा.

| | | |
|---|---|---|
| " महिलेचा विनयभंग करण्याशिवाय संदेशवहनाच्या कोणत्याही साधनाद्वारे तिला धाकदपटशा दाखवणे. | ३५४ङ. | ज्या महिलेस धोक्याची, धाकदपटशाची, किंवा भीतीची जाणीव निर्माण होते अशी महिला.". |

**१९.** फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ३२७ मधील, पोट-कलम (२) मध्ये,— सन १९७४ चा अधिनियम क्रमांक २ याच्या कलम ३२७ ची सुधारणा.

(१) " भारतीय दंड संहितेच्या " या मजकुरानंतर, " कलम ३२६क, कलम ३२६ख, " हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल ;

(२) दुस-या परंतुकानंतर, पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल :—

" परंतु तसेच, साक्षीपुरावा नोंदविणा-या पीठासीन अधिका-याच्या कक्षात गुप्त (in camera) कार्यवाही करविण्यात येईल आणि पीडित व्यक्तीस किंवा दुर्बल साक्षीदारास सुरक्षित वाटावे यासाठी अशा पीठासीन अधिकाऱ्याकडून सर्वोतोपरी प्रयत्न करण्यात येईल आणि याची साक्षीपुराव्यामध्ये नोंद करण्यात येईल.".

**२०.** फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ३७४ मधील, पोट-कलम (४) मध्ये,— सन १९७४ चा अधिनियम क्रमांक २ याच्या कलम ३७४ ची सुधारणा.

१८६० चा ४५. (१) " जेव्हा भारतीय दंड संहितेच्या " या मजकुरानंतर, " कलम ३२६क, कलम ३२६ख," हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल ;

(२) " सहा महिन्यांच्या " या मजकुराऐवजी, " पंचेचाळीस दिवसांच्या " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

**२१.** फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ३७७ मधील, पोट-कलम (४) मध्ये,— सन १९७४ चा अधिनियम क्रमांक २ याच्या कलम ३७७ ची सुधारणा.

(१) " जेव्हा भारतीय दंड संहितेच्या " या मजकुरानंतर, " कलम ३२६क, कलम ३२६ख " हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल ;

(२) " सहा महिन्यांच्या " या मजकुराऐवजी, " पंचेचाळीस दिवसांच्या " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

१९९३ चा महा. २४. [**२२.** फौजदारी प्रक्रिया संहिता (महाराष्ट्र सुधारणा) अधिनियम, १९९३ याद्वारे दाखल केलेल्या फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४३८ मधील, पोट-कलम (२) नंतर, पुढील पोट-कलम समाविष्ट करण्यात येईल :— सन १९७४ चा अधिनियम क्रमांक २ याच्या कलम ४३८ ची सुधारणा.

१८६० चा ४५. " (२क) या कलमातील कोणतीही गोष्ट, भारतीय दंड संहिता, याच्या कलम ३२६क किंवा कलम ३२६ख किंवा कलम ३७६ किंवा कलम ३७६क किंवा कलम ३७६कख किंवा कलम ३७६घ किंवा कलम ३७६घक किंवा कलम ३७६घख किंवा कलम ३७६ङ यांखालील अपराध केला असल्याचा आरोप असणा-या कोणत्याही व्यक्तीच्या अटकेचा अंतर्भाव असणा-या कोणत्याही प्रकरणास लागू असणार नाही.".]

१८६० चा ४५. **[२३.]** **<u>२२.</u>** फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४३९ मधील, पोट-कलम (१क) मध्ये, " भारतीय दंड संहितेच्या" या मजकुराने सुरू होणाऱ्या व " कलम ३७६ घख खालील व्यक्तीच्या " या मजकुराने संपणाऱ्या मजकुराऐवजी, पुढील मजकूर दाखल करण्यात येईल :— सन १९७४ चा अधिनियम क्रमांक २ याच्या कलम ४३९ ची सुधारणा.

१८६० चा ४५. " भारतीय दंड संहितेच्या, कलम ३२६क किंवा कलम ३२६ख, किंवा कलम ३७६ चे पोट-कलम (३) किंवा कलम ३७६कख किंवा कलम ३७६घक किंवा कलम ३७६घख किंवा कलम ३७६ङ यांखालील व्यक्तीच्या ".

सन १९७४ चा अधिनियम क्रमांक २ याच्या पहिल्या अनुसूचीची सुधारणा.

[२४.] २३. फौजदारी प्रक्रिया संहितेच्या पहिल्या अनुसूचीमधील, " **एक.—भारतीय दंड संहितेखालील अपराध** ", या शीर्षाखालील,—

(क) कलम १७५ शी संबंधित असणा-या नोंदीनंतर, पुढील नोंद समाविष्ट करण्यात येईल :—

| | | | | |
|---|---|---|---|---|
| " १७५क. समाजमाध्यम व [आंतरजाल किंवा चल दूरभाष (मोबाईल टेलिफोनी) संदेशवहन प्रणाली विदा (डेटा)] इंटरनेट किंवा मोबाईल टेलीफोनी डेटा पुरवठादार, इत्यादींनी [विदा (डेटा)] डेटा पुरविण्यास कसूर करणे. | [१] ३ महिन्यापर्यंत साधा कारावास किंवा [५,००,०००] २५,००,००० रुपयांचा द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | दखलपात्र | जामीनपात्र | प्रथमवर्ग दंडाधिकारी." ; |

(ख) कलम १८२ शी संबंधित असणा-या नोंदीनंतर, पुढील नोंद समाविष्ट करण्यात येईल :—

| | | | | |
|---|---|---|---|---|
| " १८२क. लोकसेवकाला विवक्षित अपराधांची खोटी तक्रार किंवा खोटी माहिती दिल्याबद्दल शिक्षा. | [१ वर्षापर्यंत साधा कारावास किंवा द्रव्यदंड, किंवा दोन्ही.] १ वर्षापेक्षा कमी नसेल परंतु ३ वर्षापर्यंत असू शकेल इतका साधा कारावास आणि १,००,००० रुपयापर्यंत असू शकेल इतका द्रव्यदंड. | दखलपात्र | जामीनपात्र | प्रथमवर्ग दंडाधिकारी." ; |

(ग) कलमे ३२६क व ३२६ख यांच्याशी संबंधित असणा-या नोंदीऐवजी, पुढील नोंदी दाखल करण्यात येतील :—

| | | | | |
|---|---|---|---|---|
| "३२६क. ॲसिड, इत्यादींचा वापर करून स्वेच्छेने गंभीर दुखापत करणे. | [१० वर्षांपेक्षा कमी नसेल परंतु, जी अशा व्यक्तीच्या नैसर्गिक जीवनाच्या उर्वरित काळापर्यंत असू शकेल इतका कारावास आणि पीडित व्यक्तीला प्रदान करावयाचा द्रव्यदंड किंवा निर्णायक पुरावा असलेल्या घोर अपराधाच्या बाबतीत मृत्युदंड] पंधरा वर्षांपेक्षा कमी नसेल परंतु, जी अशा व्यक्तीच्या नैसर्गिक जीवनाच्या उर्वरित काळापर्यंत असू शकेल इतका कारावास आणि पीडित व्यक्तीला प्रदान करावयाचा द्रव्यदंड. | दखलपात्र | अजामीनपात्र | सत्र न्यायालय. |
| ३२६ख. स्वेच्छेने ॲसिड फेकणे किंवा फेकण्याचा प्रयत्न करणे. | ७ वर्षांपेक्षा कमी नसेल, परंतु, दहा वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीचा कारावास. | दखलपात्र | अजामीनपात्र | सत्र न्यायालय."; |

(घ) कलम ३५४घ शी संबंधित असणा-या नोंदीनंतर, पुढील नोंद समाविष्ट करण्यात येईल :—

| | | | | |
|---|---|---|---|---|
| "३५४ङ. महिलेचा विनयभंग करण्या-शिवाय संदेशवहनाच्या कोणत्याही साधनाने तिला धाकदपटशा दाखवणे. | २ वर्षांपर्यंतच्या मुदतीचा कोणत्याही वर्णनाचा कारावास आणि १,००,००० रुपयांपर्यंत असू शकेल इतका द्रव्यदंड. | दखलपात्र | जामीनपात्र | कोणताही दंडाधिकारी."; |

(ङ) कलम ३७६ शी संबंधित असणाऱ्या नोंदीऐवजी, पुढील नोंदी दाखल करण्यात येतील :—

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| "३७६(१) | पोट-कलम (२) खाली समाविष्ट असलेल्या व्यक्तींखेरीज इतर व्यक्तींनी केलेला बलात्कार. | १० वर्षांपेक्षा कमी नसेल परंतु आजीवन कारावासा-पर्यंत असू शकेल इतका सश्रम कारावास शिक्षा व द्रव्यदंड. निर्णायक पुरावा असलेल्या घोर अपराधाच्या बाबतीत, मृत्यूदंड. | दखलपात्र | अजामीनपात्र | सत्र न्यायालय. |
| ३७६(२) | प्राधिकाऱ्याने किंवा विश्वासू व्यक्तीने केलेला बलात्कार. | १० वर्षांपेक्षा कमी नसेल परंतु, आजीवन कारावासापर्यंत असू शकेल इतका सश्रम कारावास याचा अर्थ व्यक्तीच्या नैसर्गिक जीवनाच्या उर्वरित काळापर्यंत इतका सश्रम कारावास व द्रव्यदंड. निर्णायक पुरावा असलेल्या घोर अपराधाच्या बाबतीत, मृत्यूदंड. | दखलपात्र | अजामीनपात्र | सत्र न्यायालय. |
| ३७६(३) | १६ वर्षे वयाखालील महिलेवर बलात्कार केल्याचा अपराध करणाऱ्या व्यक्ती. | २० वर्षांपेक्षा कमी नसेल परंतु, आजीवन कारावासापर्यंत असू शकेल इतका सश्रम कारावास याचा अर्थ व्यक्तीच्या नैसर्गिक जीवनाच्या उर्वरित काळापर्यंत असू शकेल इतक्या सश्रम कारावासाची व द्रव्यदंड. निर्णायकपुरावा असलेल्या घोर अपराधाच्या बाबतीत, मृत्यूदंड. | दखलपात्र | अजामीनपात्र | सत्र न्यायालय."; |

(च) कलमे ३७६घ व ३७६घक शी संबंधित असणाऱ्या नोंदीऐवजी, पुढील नोंदी दाखल करण्यात येतील :--

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| " ३७६घ | सामूहिक बलात्कार. | २० वर्षांपेक्षा कमी नसेल परंतु, आजीवन कारावासापर्यंत असू शकेल इतका सश्रम कारावास याचा अर्थ व्यक्तीच्या नैसर्गिक जीवनाच्या उर्वरित काळापर्यंत असू शकेल इतक्या सश्रम कारावासाची शिक्षा आणि पीडित व्यक्तीला प्रदान करावयाचा द्रव्यदंड. निर्णायक पुरावा असलेल्या घोर अपराधाच्या बाबतीत, मृत्यूदंड. | दखलपात्र | अजामीनपात्र | सत्र न्यायालय. |
| ३७६घक | १६ वर्षे वयाखालील महिलेवर सामूहिक बलात्कार. | आजीवन कारावास याचा अर्थ, त्या व्यक्तीच्या नैसर्गिक जीवनाच्या उर्वरित काळासाठी कारावास व द्रव्यदंड. निर्णायक पुरावा असलेल्या घोर अपराधाच्या-बाबतीत, मृत्यूदंड. | दखलपात्र | अजामीनपात्र | सत्र न्यायालय.". |

## प्रकरण चार

## लैंगिक अपराधांपासून बालकांचे संरक्षण अधिनियम, २०१२ याच्या सुधारणा.

सन २०१२ चा अधिनियम क्रमांक ३२ याच्या कलम २ ची सुधारणा.

**[२५.] २४.** लैंगिक अपराधांपासून बालकांचे संरक्षण अधिनियम, २०१२, तो महाराष्ट्र राज्यास लागू असताना, (यात यापुढे, या प्रकरणामध्ये, ज्याचा निर्देश, " लैंगिक अपराधांपासून बालकांचे संरक्षण अधिनियम " असा केला आहे) याच्या कलम २ मध्ये, खंड (ड) नंतर, पुढील खंड जादा दाखल करण्यात येईल :— २०१२ चा ३२.

"(ढ) " कर्मचारी वर्ग " याचा अर्थ, नियमित, तात्पुरता, कंत्राटी कर्मचारी किंवा कामगार म्हणून नियुक्त केलेली कोणतीही व्यक्ती, असा आहे आणि त्यात कोणत्याही प्रकारचे सहाय्य देणाऱ्या बाह्यस्रोत अभिकरणाने पुरविलेल्या कोणत्याही व्यक्तीचा समावेश होतो.".

सन २०१२ चा अधिनियम क्रमांक ३२ याच्या कलम ४ ची सुधारणा.

**[२६.] २५.** लैंगिक अपराधांपासून बालकांचे संरक्षण अधिनियम, याच्या कलम ४ मधील, पोट-कलम (२) मध्ये, " द्रव्यदंडास देखील पात्र असेल " या मजकुराऐवजी, " पाच लाख रुपयांपेक्षा कमी नसेल इतक्या द्रव्यदंडास देखील पात्र असेल किंवा ज्या प्रकरणी अपराधांचे वैशिष्ट्य घोर स्वरूपाचे आहे आणि जेथे पुरेसा निर्णायक पुरावा आहे आणि जरब बसवणारी शिक्षा देण्याची खात्री पटेल अशी परिस्थिती आहे अशा प्रकरणी, मृत्युदंडास पात्र असेल " हा मजकूर जादा दाखल करण्यात येईल.

सन २०१२ चा अधिनियम क्रमांक ३२ याच्या कलम ५ ची सुधारणा.

**[२७.] २६.** लैंगिक अपराधांपासून बालकांचे संरक्षण अधिनियमाच्या कलम ५ मध्ये,—

(क) खंड (घ) मधील, " यांचा सहवासी असणारा " या मजकुरानंतर, " किंवा रहिवासी असणारा " हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल ;

(ख) खंड (ज) मधील, " क्षारक पदार्थ ; किंवा " या मजकुराऐवजी, " क्षारक वस्तू किंवा मादक पदार्थ ; किंवा " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ग) खंड (ञ) मधील, उप-खंड (एक) मध्ये, " मानसिक स्वास्थ्य अधिनियम, १९८७ याच्या कलम २ च्या खंड (ठ) अन्वये व्याख्या केल्याप्रमाणे, बालकास मनोरुग्ण करण्यास तो कारणीभूत होतो " या मजकुराऐवजी, " मानसिक स्वास्थ्य अधिनियम, २०१७ याच्या कलम २ च्या खंड (ठ) अन्वये व्याख्या केल्याप्रमाणे, बालकास मानसिक आजाराने ग्रस्त होण्यास कारणीभूत होतो " हा मजकूर दाखल करण्यात येईल. १९८७ चा १४. २०१७ चा १०.

सन २०१२ चा अधिनियम क्रमांक ३२ याच्या कलम ८ ची सुधारणा.

**[२८.] २७.** लैंगिक अपराधांपासून बालकांचे संरक्षण अधिनियमाच्या कलम ८ मधील, " तीन वर्षांपेक्षा कमी नसेल, परंतु पाच वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची शिक्षा होईल " या मजकुराऐवजी, " पाच वर्षांपेक्षा कमी नसेल, परंतु सात वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची शिक्षा होईल " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन २०१२ चा अधिनियम क्रमांक ३२ याच्या कलम ९ ची सुधारणा.

**[२९.] २८.** लैंगिक अपराधांपासून बालकांचे संरक्षण अधिनियमाच्या कलम ९ मधील,—

(क) खंड (घ) मध्ये, " सहवासी असणारा " या मजकुरानंतर, " किंवा रहिवासी असणारा " हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल ;

(ख) खंड (ज) मध्ये, " क्षारक पदार्थ ; किंवा " या मजकुराऐवजी, " क्षारक पदार्थ किंवा मादक द्रव्य ; किंवा " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ग) खंड (ञ) मधील, उप-खंड (एक) मध्ये " मानसिक स्वास्थ्य अधिनियम, १९८७ याच्या कलम २ च्या खंड (ठ) अन्वये व्याख्या केल्याप्रमाणे, बालकास मनोरुग्ण करण्यास " या मजकुराऐवजी, " मानसिक स्वास्थ्य अधिनियम, २०१७ याच्या कलम २ च्या खंड (ठ) अन्वये व्याख्या केल्याप्रमाणे, बालकास मानसिक आजाराने ग्रस्त होण्यास " हा मजकूर दाखल करण्यात येईल. १९८७ चा १४. २०१७ चा १०.

सन २०१२ चा अधिनियम क्रमांक ३२ याच्या कलम १० ची सुधारणा.

**[३०.] २९.** लैंगिक अपराधांपासून बालकांचे संरक्षण अधिनियमाच्या कलम १० मध्ये, " पाच वर्षांपेक्षा कमी नसेल परंतु सात वर्षांपर्यंत असू शकेल " या मजकुराऐवजी, " सात वर्षांपेक्षा कमी नसेल, परंतु दहा वर्षांपर्यंत असू शकेल " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन २०१२ चा अधिनियम क्रमांक ३२ याच्या कलम २३क समाविष्ट करणे.

**[३१.] ३०.** लैंगिक अपराधांपासून बालकांचे संरक्षण अधिनियम याच्या कलम २३ नंतर, पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :—

पोलीस अन्वेषणाकरिता [विदा (डेटा)] डेटा पुरविण्यात कसूर करणे.

“ **२३क.** त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी, कोणताही मध्यस्थ किंवा परिरक्षक यांसह जो कोणतेही समाजमाध्यम व्यासपीठ किंवा [आंतरजाल किंवा चल दूरभाष संदेशवहन प्रणाली (मोबाईल टेलीफोनी) विदा (डेटा)] इंटरनेट किंवा मोबाईल टेलिफोनी डेटा पुरवठादार, या अधिनियमान्वये शिक्षापात्र असलेल्या अपराधाचे अन्वेषण करण्याच्या प्रयोजनार्थ, अन्वेषण अधिकाऱ्याने मागणी केल्याप्रमाणे, त्यास, अशी मागणी मिळाल्यापासून, कामकाजाच्या [सात] तीन दिवसांच्या कालावधीत, अशी कोणतीही [विदा (डेटा)] डेटा पुरविण्यास कसूर करील, तो, [एक] तीन महिन्यापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाच्या शिक्षेस किंवा [पाच लाख] पंचवीस लाख रुपये इतक्या द्रव्यदंडाच्या किंवा दोन्ही शिक्षेस पात्र असेल.”.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई